तरुण भारत

# डॉ. तनुजा नाफडे यांचे सुश्राव्य गायन



◆ नागपूर, २८ सप्टेंबर

स्वरांजली, नवी दिल्ली या संस्थेच्यावतीने 'आझादी का अमृत महोत्सव' अंतर्गत नवी दिल्ली येथील त्रिवेणी कला संगम सभागृहात २४ व २५ सप्टेंबरला 'कलर्स ऑफ इंडिया' या शास्त्रीय संगीत महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. श्री सुब्रत डे यांची ही संकल्पना होती.

या महोत्सवाचा समारोप नागपूरच्या ज्येष्ठ शास्त्रीय गायिका, आर. एस. मुंडले धरमपेठ कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. तनुजा नाफडे यांच्या सुश्राव्य गायनाने झाला. विदुषी डॉ. तनुजा नाफडे किराणा घराण्याच्या गायिका असून, भारतीय शास्त्रीय संगीतावर आधारित पहिल्या मार्शल ट्यूनच्या संगीतकार म्हणून सुपरिचित आहेत. डॉ. नाफडे यांनी गायलेल्या तडफदार तसेच वैचित्र्यपूर्ण तानांनी एक वेगळीच वातावरण निर्मिती झाली. त्यांना तबल्यावर देबाशिष अधिकारी यांनी तर संवादिनीवर ललित सिसोदिया यांनी साथ-संगत केली.

◀(तभा वृत्तसेवा)

SUNDAY, February 5, 2023

The Hitavada

# 'We need other human beings to be human'

■ Staff Reporter

"TO DO wrong is the basic con-'tion of life. There exists a banality of evil, which perpetuates when immorality gets normalised over time. Then, evil becomes common place, and we become our everyday evil. So, how does one become someone who does not perpetrate? Someone who consciously makes a choice not to? It is through these lived imaginative moments that safely offer themselves in a tight bound book does one experience empathy," said Aakash Singh Rathore, Philosopher, Author and Ironman triathlete.

Providing a searing awareness of evil that is so banal and ordinary and the need for inclusion, Rathore said, "The self needs others in order to be oneself." Reflecting on the excluded 'other', he said, "The privileged among us, who make executive decisions often act from the position of solipsism. So far, to an extent that, one questions whether others exists at all."




Satish Raut

Aakash Singh Rathore addressing at Vidarbha Literary Festival. Dr Manju Dubey and Hemant Lodha also are seen.

While inclusion is a virtue, it is not inherently straightforward. There are types of inclusion. "You can be included, but not recognised, you are patronised, which is a very common feature. High quality inclusion requires a change of perspective," he added. This solipsism appears to have a solution in Dialectic philosophy. It recognises that we need others in order to be a 'self'. A 'self' worthy of empathy, a 'self' that is not the perpetrator of evil. It is in literature that one finds an opportunity to imaginatively live the lived experiences. Addressing the audience as a Keynote speaker at Vidarbha Literary Festival inauguration, on Saturday, he said, "We 'include' for the possibility of completeness. And literature allows one to transcend the experience of 'others'. Per say, 'how does it feel to be other?'. This cognitive ability helps one feel empathy. Thus the self needs the 'other' in order to be itself."

'Vidarbha Literary Festival 2023: Non-fiction for Inclusion', was inaugurated on Saturday at Chitnavis Centre.

Hemant Lodha, Chairperson, VLF, said, "The idea of a LitFest is to bring the world of ideas to many readers. Our festival is all embracing and inclusive in nature." Expanding on the idea of inclusion of library in a literature festival, Dr Manju Dubey, Librarian said, "Libraries are the connecting link between the past and the future as they host a treasure of knowledge. In this digital age, libraries are still relevant and they will continue to persist."

Under the clear blue sky and amidst warmth of the sun, Pawan Sarda, Festival Director announced the programme open to all.

The festival will feature 24 sessions with prolific authors from 9.45 am to 5 pm, followed by cultural event on Sunday.

महाराष्ट्र टाइम्स ।
नागपूर । गुरुवार, २ फेब्रुवारी २०२३ ।

# 'बिटींग द रिट्रीट'मध्ये निनादला 'शंखनाद'

म. टा. प्रतिनिधी, नागपूर



भारतीय गणराज्यदिन समारोहाचा समारोप बिटींग द रिट्रीट या कार्यक्रमाने होत असतो. यंदा २९ जानेवारीला दिल्लीच्या विजय चौकात झालेल्या कार्यक्रमात नागपूरच्या संगीतज्ञ प्रा. डॉ. तनुजा नाफडे यांनी भारतीय लष्करासाठी संगीतबद्ध केलेल्या शंखनाद या संपूर्ण भारतीय सुरावटीतील मार्शल ट्यूनचे वादन करण्यात आले.

कार्यक्रमाला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, पंतप्रधान नरेंद्र मोदी, संरक्षणमंत्री राजनाथसिंह यांच्यासह केंद्रीय मंत्रीमंडळातील सदस्य, वरिष्ठ शासकीय अधिकारी, परराष्ट्रांचे राजदूत आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमात लष्कराच्या विविध रेजिमेंटची गीते लष्कराच्या बॅण्डवर वाजविण्यात आली. याचवेळी लष्कराच्या बॅण्डने शंखनाद या मार्शल ट्यूनचेही सादरीकरण केले. शंखनाद ही भारतीय लष्कराला स्वातंत्र्यानंतर मिळालेली पहिली भारतीय शास्त्रीय संगीतावर आधारित भारतीय सुरावटीची धून आहे. ती डॉ. नाफडे यांनी संगीतबद्ध केली असून त्यांनी लष्कराच्या वादकांनीही प्रशिक्षित केलेले आहे. केंद्रीय संरक्षण मंत्रालयाने ८ ऑक्टोबर २०१८ रोजी या मार्शल ट्यूनला मान्यता दिलेली आहे. त्यानंतर १५ जानेवारी २०१९ रोजी आर्मी डे समारोहात तसेच २६ जानेवारी २०१९ रोजी दिल्लीच्या कर्तव्य पथावर आयोजित गणराज्यदिनाच्या पथसंचलनात लष्कराच्या बॅण्डने शंखनाद ही मार्शल ट्यून सादर केली होती. डॉ. नाफडे या आर. एस. मुंडले धरमपेठ आर्ट्स अॅण्ड कॉमर्स कॉलेजच्या संगीत विभागप्रमुख आणि प्राचार्य म्हणून कार्यरत आहेत. स्वातंत्र्यानंतर भारतीय लष्कराने प्रथमच ही भारतीय शास्त्रीय सुरावटीची मार्शल ट्युन बनवली असून ती बनवणाऱ्या डॉ. नाफडे पहिल्या महिला भारतीय गैरलष्करी नागरिक आहेत.

सकाळ
नागपूर, शुक्रवार, ३ फेब्रुवारी २०२३

# 'बीटिंग द रिट्रीट'मध्ये वाजली 'शंखनाद' मार्शल ट्यून

▶ सकाळ वृत्तसेवा

नागपूर, ता. २ : भारतीय गणराज्य दिनाच्या 'बीटिंग द रिट्रीट' कार्यक्रमात येथील संगीततज्ज्ञ प्रा. डॉ. तनुजा नाफडे यांनी भारतीय लष्करासाठी संगीतबद्ध केलेल्या शंखनाद या संपूर्ण भारतीय सुरावटीतील मार्शल ट्यूनचे वादन करण्यात आले.

२९ जानेवारीला झालेल्या 'बीटिंग द रिट्रीट' कार्यक्रमाला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, पंतप्रधान नरेंद्र मोदी, संरक्षण मंत्री राजनाथसिंह यांच्यासह केंद्रीय मंत्रिमंडळातील सदस्य उपस्थित होते. यावेळी लष्कराच्या विविध रेजिमेंटची गीते लष्कराच्या बँडवर वाजविण्यात आली. याचवेळी लष्कराच्या बँडने शंखनाद या मार्शल ट्यूनचेही सादरीकरण केले. शंखनाद ही भारतीय लष्कराला स्वातंत्र्यानंतर मिळालेली पहिली भारतीय शास्त्रीय संगीतावर आधारित भारतीय सुरावटीची धून आहे. ही ट्यून डॉ. नाफडे यांनी संगीतबद्ध केलेली आहे.


तनुजा नाफडे

त्यांनी लष्कराच्या वाचकांनाही प्रशिक्षित केलेले आहे. केंद्रीय संरक्षण मंत्रालयाने ८ ऑक्टोबर २०१८ रोजी या मार्शल ट्यूनला मान्यता दिली आहे. त्यानंतर १५ जानेवारी २०१९ रोजी आर्मी डे समारोहात तसेच २६ जानेवारी २०१९ रोजी दिल्लीच्या कर्तव्य पथावर आयोजित गणराज्य दिनाच्या पथसंचलनात ही ट्यून सादर केली होती.

डॉ. नाफडे या नागपूरच्या आर. एस. मुंडले धरमपेठ आर्ट्स अँड कॉमर्स कॉलेजच्या संगीत विभाग प्रमुख आणि प्राचार्य आहेत. ख्यातनाम संगीतकार पं. हरीहरन यांच्यासोबत त्यांचे म्युझिक अल्बम प्रकाशित झालेले आहेत. रशियाची राजधानी मास्को येथील भारतीय दूतावासात भारतीय शास्त्रीय संगीताच्या वेस्टर्न फ्युजनवर कार्यक्रम सादर करण्याचा मान त्यांना मिळाला.

महाराष्ट्र टाइम्स | नागपूर । रविवार, २६ फेब्रुवारी २०२३ ।

# काळ संकल्पनेला जीवनाच्या अर्थशास्त्रात मोठे महत्त्व




व्याख्यानात बोलताना डॉ. आशुतोष रारावीकर. व्यासपीठावर अॅड. उल्हास औरंगाबादकर, डॉ. तनुजा नाफडे.

**म. टा. प्रतिनिधी**, नागपूर

■ डॉ. आशुतोष रारावीकर यांचे अमृत व्याख्यानमालेत प्रतिपादन

'जशी पैशांची गुंतवणूक केली जाते, तशी वेळेच्या बाबतीतही करायला हवी. काळ या संकल्पनेला जीवनाच्या अर्थशास्त्रात महत्त्व आहे', असे प्रतिपादन अर्थतज्ज्ञ डॉ. आशुतोष रारावीकर यांनी शनिवारी येथे केले.

धरमपेठ येथील आर. एस. मुंडले धरमपेठ कला व वाणिज्य महाविद्यालयात अमृतव्याख्यानमालेतंर्गत 'अर्थरंग अमृत जीवनाचे' या विषयावर डॉ. रारावीकर यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. मंचावर धरमपेठ शिक्षणसंस्थेचे अध्यक्ष अॅड. उल्हास औरंगाबादकर, महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. तनुजा नाफडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. रारावीकर म्हणाले, 'अर्थशास्त्रातील समत्वाचा सिद्धांत आयुष्यातही महत्त्वाचा आहे. जीवनात समत्व हा आनंदाचा आणि शांततेचा असावा. साधनसामग्रीचा योग्य वापर केल्याने म्हणजेच अंतरंगातून एकरूप झाल्यावर पांडुरंग प्राप्त होतो. बुद्धिमत्ता आणि नीतीमत्ता यामुळे राष्ट्राला सुबत्ता मिळते. संयम ही दीर्घकाळच्या सुखासाठी अल्पकाळ सोसलेली कळ आहे. सकारात्मता, संयम, सहयोग, समर्पण यामुळे जीवनाची समृद्धी होते. जीवनात समृद्धीसाठी संघर्ष नाही तर सौहार्दाची भावना आवश्यक आहे. यासाठी शिक्षणाचा चांगला उपयोग करायला हवा. अभ्यास अर्थार्जनाचे नव्हे तर जीवन सुधारण्याचे माध्यम आहे. जीवनाचा अर्थ शिकवितो तेच खरे शिक्षण आहे.'

सूत्रसंचालन विशाखा कस्तुरे यांनी केले. आभार डॉ. शुभांगी परांजपे यांनी मानले.

## सुखी आणि दुःखी या दोनच जाती!

'सुखी आणि दुःखी अशा माणसाच्या दोनच जाती आहेत. प्रत्येक व्यक्तीने आपल्या कर्तृत्वाच्या माध्यमातून सुखी जातीत समाविष्ट होण्याचा प्रयत्न करावा. त्याशिवाय, माणसाचा ऋतू हिवाळा, उन्हाळा नव्हे तर जिव्हाळा हा आहे. शिक्षणाला चारित्र्याची जोड दिली तर जिव्हाळा निर्माण होतो', असेही डॉ. आशुतोष रारावीकर म्हणाले.

www.tarunbharat.net
तरुण भारत
नागपूर, मंगळवार, ४ एप्रिल २०२३

# नि:स्वार्थ कार्य ही एक सेवाच

## स्वांतरंजन यांचे प्रतिपादन

## सेवाशिल्पी पुरस्कार प्रदान



स्वांतरंजन यांच्या हस्ते पुरस्कार स्वीकारताना किलान बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष पुनाजित कुळमेथे व इतर पदाधिकारी. शेजारी उल्हास औरंगाबादकर, रत्नाकर केकतपुरे व डॉ. कुमार शास्त्री

◆ नागपूर, ३ एप्रिल

नि:स्वार्थ कार्य ही एक सेवाच असून, नि:स्वार्थपणे काम करणे हे प्रत्येकाचे कर्तव्यच असल्याचे प्रतिपादन रा. स्व. संघाचे अ. भा. बौद्धिक प्रमुख स्वांतरंजन यांनी आज केले.

धरमपेठ शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ॲड. उल्हास औरंगाबादकर, उपाध्यक्ष रत्नाकर केकतपुरे, सचिव मनीष फाटक, डॉ. कुमार शास्त्री व्यासपीठावर उपस्थित होते. स्वांतरंजन म्हणाले की, पाठीवर शाबासकीची थाप असेल तर संस्था हिमतीने पुढे जात असते. संस्थेच्या कार्यकल्याने, समाजात आत्मविश्वास जागृत होत असल्याने हे आवश्यक आहे. किसान बहुउद्देशीय संस्थेचे आणि धरमपेठ शिक्षण संस्थेचे कार्य स्पृहणीयच ठरले, असे ते म्हणाले.

शिक्षक व कर्मचाऱ्यांमध्ये समाजाच्या दायित्वाची जाणीव रहावी, या उद्देशाने हा पुरस्कार सुरू केला. हे दुसरे वर्ष आहे. केवळ पुरस्कार देऊन थांबणार नाही तर यातून निर्माण झालेले नाते भविष्यातही कायम राहणार असून, पुरस्कारप्राप्त संस्थांना पहेल ते सहकार्य केले जाणार असल्याचे उल्हास औरंगाबादकर यांनी स्पष्ट केले. डॉ. कुमार शास्त्री यांनी प्रास्ताविक केले. दीपिका डाखरे यांनी सरस्वती वंदना सादर केली. डॉ. गोविंदराज भट यांनी संचालन केले. मनीष फाटक यांनी आभार मानले. रा. स्व. संघाचे विदर्भ प्रांत कार्यवाह अतुल मोघे, लोककल्याण समितीचे डॉ. दिलीप गुप्ता तसेच डॉ. गुलाब वंजारी, सुनील किटकरू, प्रा. गिरीश देशमुख, महाविद्यालयाचे प्राचार्य, शिक्षक उपस्थित होते.

धरमपेठ शिक्षण संस्थेतर्फे सामाजिक सेवाशिल्पी पुरस्कार यवतमाळ जिल्ह्यातील पांढरकवडा तालुक्यातील झरी झामणी येथील किसान बहुउद्देशीय संस्थेला स्वांतरंजन यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. ५१ हजार रुपयांचा धनादेश, सन्मानचिन्ह, शाल व श्रीफळ, असे त्याचे स्वरूप आहे. संस्थेचे अध्यक्ष पुनाजित कुळमेथे, वंदना कुळमेथे, शारदा कनाके, रंजना गेडाम, किरण कुनघाटकर या पदाधिकाऱ्यांनी तो स्वीकारला. पुनाजित कुळमेथे यांनी मनोगत व्यक्त केले. ◀ (तभा वृत्तसेवा)

# Dharma means performing duty: RSS' Swant Ranjan

■ Staff Reporter

SWANT Ranjan, the all-India Baudhik Pramukh of the Rashtriya Swayamsevak Sangh (RSS), on Monday, said, Dharma means performing duty. "One should perform his/her duty properly to make the country 'Atmanirbhar' (self-reliant) in all senses," he said.

Ranjan was speaking in the felicitation programme of 'Kisan Bahuddeshiya Sanstha' organised by the Dharampeth Education Society at R S Mundle Dharampeth Arts and Commerce College.

Ulhas Aurangabadkar, President of Dharampeth Education Society, presided over the function. Dr Kumar Shastri, Mangesh Fatak, Secretary of the Society and Ratnakar Kekatpure were present on the dais. Punajeet Kudmethe, President of 'Kisan Bahuddeshiya Sanstha' with office-bearers were felicitated with 'Samajik Sevashilpi Puraskar - 2023' in the function. Swant Ranjan further said that such felicitation programmes would boost morale of the organisations which are taking painstaking efforts for the betterment of the society. "We should think about society. The individual is not separate from the society, which is a group of thoughtful individuals," he said, adding that, those who are working for the society should be helped.


Satish Raut

Office-bearers of Kishan Bahuuddeshiya Sanstha felicitated with 'Samajik Sevashilpi Puraskar - 2023' at the hands of Swant Ranjan, all-India Baudhik Pramukh of RSS, on Monday.

Elaborating on the importance of education, Swant Ranjan said that education is important for everyone as it shapes the learner into a humble person. Education increases the capacity of individuals, he claimed. Ulhas Aurangabadkar appealed to people to help organisations like 'Kisan Bahuddeshiya Sanstha' with financial assistance. Such organisations are working hard in remote areas to solve problems without selfishness. Dr Kumar Shastri delivered an introductory speech and informed about critical problems arising in the tribal areas. Punajeet Kudmethe elaborated the problems he faced while taking his Sanstha's work ahead. He also highlighted growing conversion instances in the rural area. Dr Govind Bhat compered the programme, while Mangesh Fatak proposed the vote of thanks.

## एआईसीटीई अध्यक्ष ने दीक्षांत समारोह में विद्यार्थियों को दिया जीवन का मंत्र

# सकारात्मक बदलाव लाने का नाम जीवन है

### उत्कृष्ट प्रदर्शन करने वाले 108 विद्यार्थियों को कुल 195 मेडल और पुरस्कार प्रदान किए गए

भास्कर प्रतिनिधि | नागपुर

जीवन का असली मतलब पांच अंकों का वेतन, कार, 3-बीएचके घर और एक छोटा परिवार ही नहीं होता। जीवन इन वस्तुओं को अर्जित करने से कहीं अधिक है। जीवन रिश्ते बनाने, अपनी रुचि का काम करने और विश्व में एक सकारात्मक बदलाव लाने का नाम है। अखिल भारतीय तकनीकी शिक्षा परिषद (एआईसीटीई) के अध्यक्ष प्रो. टी. जी. सीताराम ने गुरुवार को राष्ट्रसंत तुकड़ोजी महाराज नागपुर विश्वविद्यालय के 110वें दीक्षांत समारोह में बतौर मुख्य अतिथि विद्यार्थियों को यह मूल मंत्र दिया। शहर के सिविल लाइंस स्थित देशपांडे सभागृह में समारोह आयोजित किया गया था। प्रो. सीताराम ने कहा कि युवा स्नातकों को आधुनिक और पारंपरिक दोनों ज्ञान का उपयोग करके समाज की समस्याओं का समाधान ढूंढना चाहिए। उन्होंने शिक्षकों से भी कोरोनाकाल में भारत द्वारा हासिल की गई उपलब्धियों के बारे में विद्यार्थियों को पढ़ाने की अपील की। कार्यक्रम की अध्यक्षता प्रदेश के राज्यपाल रमेश बैस ने की। प्रस्तावना विवि कुलगुरु डॉ. सुभाष चौधरी ने रखी। आभार प्रदर्शन कुलसचिव डॉ. राजू हिवसे ने किया।

**1.01 लाख डिग्रियां दी गईं :** दीक्षांत समारोह में 1 लाख 1 हजार 722 विद्यार्थियों को डिग्री और 330 को डिप्लोमा प्रदान किए गए, साथ ही 280 शोधार्थियों को पीएचडी डिग्री दी गई। 4 शोधार्थियों को मरणोपरांत पीएचडी घोषित की गई। परीक्षा में उत्कृष्ट प्रदर्शन करने वाले 108 विद्यार्थियों को कुल 195 मेडल और पुरस्कार प्रदान किए गए। ऐसे ही डॉ. शुभांगी परांजपे को डी. लिट डिग्री प्रदान की गई। अकॉस्टिक क्षेत्र के लिए अंकित पालेवार को डॉ. राजगोपालन गोल्ड मेडल दिया गया। यह पुरस्कार पहली बार प्रदान किया गया है।



### ये रहे उत्कृष्ट

- नागपुर विवि के डॉ. बाबासाहब आंबेडकर विधि महाविद्यालय की छात्रा नंदिनी समीर सोहनी को सर्वाधिक 7 गोल्ड मेडल व 2 पुरस्कार से सम्मानित किया गया।
- डॉ. आंबेडकर इंस्टीट्यूट ऑफ मैनेजमेंट स्टडीज एंड रिसर्च के छात्र विक्की सुधाकर पडोले को 7 गोल्ड मेडल से सम्मानित किया गया।
- नागपुर विवि के डॉ. बाबासाहब आंबेडकर विधि महाविद्यालय की छात्रा अनुप्रिया रवींद्र कुमार प्रसाद को 5 गोल्ड मेडल से नवाजा गया।
- संताजी महाविद्यालय के छात्र आदर्श कमलादास गिर्हेपुंजे को 4 गोल्ड मेडल व 1 सिल्वर मेडल से सम्मानित किया गया।
- अरविंदबाबू देशमुख कला व वाणिज्य महाविद्यालय भारसिंगी के छात्र सोमराज पुंडलिक गिरडकर को 4 गोल्ड मेडल व 1 पुरस्कार से सम्मानित किया गया।
- नागपुर विवि के डॉ. आंबेडकर विचारधारा विभाग की छात्रा राजश्री भेजराज ढबाले को 4 गोल्ड मेडल व 1 पुरस्कार प्रदान किया गया।

### परिवार में सभी वकील

नंदिनी समीर सोहनी के अनुसार उनके परिवार में उनके दादा वकील थे। ऐसे ही पिता, भाई और मां भी वकील हैं। ऐसे में उन्होंने भी इसी क्षेत्र को चुना। उन्हें श्रम कानून में विशेष रुचि है और इसी में वे स्नातकोत्तर की पढ़ाई भी करना चाहती हैं। उन्होंने नियमित परिश्रम को ही सफलता की कुंजी बताया है।

### किसान परिवार से हैं



विक्की सुधाकर पडोले ने बताया कि वे किसान परिवार से हैं। पिता किसानी करके परिवार चलाते हैं। खराब मौसम या अन्य विकट परिस्थितियों के चलते कई बार फसल को नुकसान होता है। कई मुश्किलों के बाद भी पढ़ाई जारी रखी। नौकरी करके देख चुके हैं, उसमें मन नहीं लगा, इसलिए अब नेट परीक्षा देकर अध्यापन के पेशे में जाना चाहते हैं।

### फिल्मों से प्रेरणा मिली



अनुप्रिया रवींद्र कुमार प्रसाद ने बताया कि उनके पिता सिविल इंजीनियर हैं। परिवार की खासियत है कि किसी भी सदस्य का पेशा एक जैसा नहीं है। बचपन में फिल्में देख कर वकालत के प्रति रुचि हुई, इसलिए बड़े होकर विधि पाठ्यक्रम में प्रवेश लिया। आगे एलएलएम की पढ़ाई करके कॉर्पोरेट क्षेत्र के मामलों में वकालत करने की इच्छा है।

MMER SPECIAL
M - SALE
4, 15, 16
PRIL 2023
M TO 9 PM
YA TOPE HALL,
NDRA NAGAR,
NAGPUR
766643968

आपलं नागपूर
तरुण भारत
नागपूर, शुक्रवार, १४ एप्रिल २०२३ 

# कौशल्याधारित शिक्षण, प्रशिक्षण गरजेचे

## कुलपती रमेश बैस यांचे प्रतिपादन ● राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा ११० वा दीक्षान्त समारंभ



दीक्षान्त समारोहात मार्गदर्शन करताना राज्यपाल रमेश बैस, तर वयाच्या ८५ व्या वर्षी आचार्य पदवी घेणारे अशोक करंदीकर यांना डॉ. विठ्ठलराव जिभकाटे पारितोषिकाने सन्मानित करताना टी. जी. सीताराम, सोबत डॉ. सुभाष चौधरी, डॉ. संजय दुधे, डॉ. राजू हिवसे

◆ **नागपूर, १३ एप्रिल**

कौशल्याधारित शिक्षण, प्रशिक्षण गरजेचे असून, विद्यापीठ आणि विद्यार्थ्यांनीसुद्धा ही बाब गांभीर्याने घेत त्या दिशेने प्रयत्न करावे, असे आवाहन कुलपती आणि राज्यपाल रमेश बैस यांनी आज येथे केले.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा ११० वा दीक्षान्त समारंभ.आज डॉ. वसंतराव देशपांडे स्मृती सभागृहात उत्साहात पार पडला. अ. भा. तंत्रशिक्षण परिषदेचे अध्यक्ष डॉ. टी. जी. सीताराम, कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी, प्र-कुलगुरू डॉ. संजय दुधे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. प्रफुल्ल साबळे तसेच समय बन्सोड, डॉ. संजय कविश्वर यांच्यासह विविध विद्याशाखांचे अधिष्ठाता व्यासपीठावर उपस्थित होते.

कुलपती रमेश बैस म्हणाले की, जगाला कुशल मनुष्यबळ पुरविण्याचे आव्हान नागपूर विद्यापीठाने स्वीकारावे.

विविध देशांना आज कौशल्याधारित मनुष्यबळाची नितांत गरज आहे. कौशल्याधारित शिक्षण, प्रशिक्षण गरजेचे असून, विद्यापीठ आणि विद्यार्थ्यांनीसुद्धा ही बाब गांभीर्याने घेत त्या दिशेने प्रयत्न करावे. जगाची गरज पूर्ण करण्याची संधी निर्माण झाली आहे. यासाठी महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास विद्यापीठाचे सहकार्य घ्यावे.

पदवीधर असतानाही बेरोजगार आणि कमी शिकलेले मात्र कमावतात. काही कामांना कमी दर्जाचे समजणे, हे त्याचे कारण आहे. काळानुरूप बदल स्वीकारत ही मानसिकता बदलण्याची गरज आहे. पदवीधरांनी कोणत्याही कामाला 'कमी' लेखू नये. देश विकासात हातभार लावण्यासाठी स्टार्टअप निर्माते व्हावे, असे आवाहनही त्यांनी केले.

देशातील शैक्षणिक प्रगतीचा आलेख मांडत व नवीन शैक्षणिक धोरणातील महत्त्वाच्या बाबी अधोरेखित करीत डॉ. टी. जी. सीताराम यांनी संशोधनकार्य गतीने करण्याची गरज प्रतिपादित केली.

बदलत्या काळात अध्यापन पद्धतीत देशातील विद्यापीठांना बदल करण्याची गरज असून, विद्यार्थ्यांच्या कलागुणांना योग्य व्यासपीठ उपलब्ध करून देण्याची गरज असल्याचे डॉ. सीताराम म्हणाले. कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांनी प्रास्ताविकात विद्यापीठाच्या प्रगतीचा उंचावत असलेला आलेख सादर करीत विविध उपक्रमांची, विशेषत: विद्यापीठाच्या शताब्दीनिमित्ताने राबविण्यात येत असलेल्या विविध कार्यक्रमांची माहिती दिली. ◂*(तभा वृत्तसेवा)*

www.tarunbharat.net
तरुण भारत नागपूर, मंगळवार, ४ एप्रिल २०२३

# नि:स्वार्थ कार्य ही एक सेवाच

## स्वांतरंजन यांचे प्रतिपादन

## सेवाशिल्पी पुरस्कार प्रदान



स्वांतरंजन यांच्या हस्ते पुरस्कार स्वीकारताना किसान बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष पूनाजित कुळमेथे व इतर पदाधिकारी. शेजारी उल्हास औरंगाबादकर, रत्नाकर केकतपुरे व डॉ. कुमार शास्त्री

◆ **नागपूर, ३ एप्रिल**

निःस्वार्थ कार्य ही एक सेवाच असून, निःस्वार्थपणे काम करणे, हे प्रत्येकाचे कर्तव्यच असल्याचे प्रतिपादन रा. स्व. संघाचे अ. भा. बौद्धिक प्रमुख स्वांतरंजन यांनी आज केले.

धरमपेठ शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ॲड. उल्हास औरंगाबादकर, उपाध्यक्ष रत्नाकर केकतपुरे, सचिव मंगेश फाटक, डॉ. कुमार शास्त्री व्यासपीठावर उपस्थित होते. स्वांतरंजन म्हणाले की, पाठीवर शाबासकीची थाप असेल तर संस्था हिमतीने पुढे जात असते. संस्थेच्या कार्यकर्त्यांत, समाजात आत्मविश्वास जागृत होत असल्याने हे आवश्यक आहे. किसान बहुउद्देशीय संस्थेचे आणि धरमपेठ शिक्षण संस्थेचे कार्य स्पृहणीयच ठरते, असे ते म्हणाले.

शिक्षक व कर्मचाऱ्यांमध्ये समाजाच्या दायित्वाची जाणीव राहावी, या उद्देशाने हा पुरस्कार सुरू केला. हे दुसरे वर्ष आहे. केवळ पुरस्कार देऊन थांबणार नाही तर यातून निर्माण झालेले नाते भविष्यातही कायम राहणार असून, पुरस्कारप्राप्त संस्थांना पडेल ते सहकार्य केले जाणार असल्याचे उल्हास औरंगाबादकर यांनी स्पष्ट केले. डॉ. कुमार शास्त्री यांनी प्रास्ताविक केले. दीपिका डाखरे यांनी सरस्वती वंदना सादर केली. डॉ. गोविंदराज भट्ट यांनी संचालन केले. मंगेश फाटक यांनी आभार मानले. रा. स्व. संघाचे विदर्भ प्रांत कार्यवाह अतुल मोघे, लोककल्याण समितीचे डॉ. दिलीप गुप्ता तसेच डॉ. गुलाब वंजारी, सुनील किटकरू, प्रा. गिरीश देशमुख, महाविद्यालयाचे प्राचार्य, शिक्षक उपस्थित होते.

धरमपेठ शिक्षण संस्थेतर्फे सामाजिक सेवाशिल्पी पुरस्कार यवतमाळ जिल्ह्यातील पांढरकवडा तालुक्यातील झरी झामणी येथील किसान बहुउद्देशीय संस्थेला स्वांतरंजन यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. ५१ हजार रुपयांचा धनादेश, सन्मानचिन्ह, शाल व श्रीफळ, असे त्याचे स्वरूप आहे. संस्थेचे अध्यक्ष पूनाजित कुळमेथे, वंदना कुळमेथे, शारदा कनाके, रंजना गेडाम, किरण कुनघाटकर या पदाधिकाऱ्यांनी तो स्वीकारला. पूनाजित कुळमेथे यांनी मनोगत व्यक्त केले. ◀*(तभा वृत्तसेवा)*

# Dharma means performing duty: RSS' Swant Ranjan

■ Staff Reporter

SWANT Ranjan, the all-India Baudhik Pramukh of the Rashtriya Swayamsevak Sangh (RSS), on Monday, said, Dharma means performing duty. "One should perform his/her duty properly to make the country 'Atmanirbhar' (self-reliant) in all senses," he said.

Ranjan was speaking in the felicitation programme of 'Kisan Bahuddeshiya Sanstha' organised by the Dharampeth Education Society at R S Mundle Dharampeth Arts and Commerce College.

Ulhas Aurangabadkar, President of Dharampeth Education Society, presided over the function. Dr Kumar Shastri, Mangesh Fatak, Secretary of the Society and Ratnakar Kekatpure were present on the dais. Punajeet Kudmethe, President of 'Kisan Bahuddeshiya Sanstha' with office-bearers were felicitated with 'Samajik Sevashilpi Puraskar - 2023' in the function. Swant Ranjan further said that such felicitation programmes would boost morale of the organisations which are taking painstaking efforts for the betterment of the society. "We should think about society. The individual is not separate from the society, which is a group of thoughtful individuals," he said, adding that, those who are working for the society should be helped.



Satish Raut

Office-bearers of Kishan Bahuuddeshiya Sanstha felicitated with 'Samajik Sevashilpi Puraskar - 2023' at the hands of Swant Ranjan, all-India Baudhik Pramukh of RSS, on Monday.

Elaborating on the importance of education, Swant Ranjan said that education is important for everyone as it shapes the learner into a humble person. Education increases the capacity of individuals, he claimed. Ulhas Aurangabadkar appealed to people to help organisations like 'Kisan Bahuddeshiya Sanstha' with financial assistance. Such organisations are working hard in remote areas to solve problems without selfishness. Dr Kumar Shastri delivered an introductory speech and informed about critical problems arising in the tribal areas. Punajeet Kudmethe elaborated the problems he faced while taking his Sanstha's work ahead. He also highlighted growing conversion instances in the rural area. Dr Govind Bhat compered the programme, while Mangesh Fatak proposed the vote of thanks.

महाराष्ट्र टाइम्स । नागपूर । शुक्रवार, १४ एप्रिल २०२३




## नंदिनी सोहनीला सर्वाधिक पदके

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा ११०वा दीक्षांत समारंभ गुरुवारी झाला. यात डॉ. आंबेडकर लॉ कॉलेजची विद्यार्थिनी नंदिनी सोहनी सर्वाधिक सात सुवर्णपदके आणि दोन पारितोषिकांची मानकरी ठरली. तिला पदके, पारितोषिके प्रदान करताना अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेचे अध्यक्ष प्रा. टी. जी. सीताराम, कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी, प्र-कुलगुरू डॉ. संजय दुधे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे.

➤ वृत्त... ३

## आध्यात्मिक विषयात डी.लिट.



५७वर्षीय डॉ. शुभांगी परांजपे यांनी आध्यात्मिक विषयात डी.लिट. प्राप्त केली आहे. 'दत्तोपासक वासुदेवानंद सरस्वती महाराज यांचे वाङ्मय आणि जीवनदृष्टी' हा त्यांचा विषय होता. डॉ. परांजपे यांनी सांगितले की, 'यादरम्यान अनेक अडचणींचा सामना करावा लागला. मात्र, साक्षात ईश्वरानेच संशोधनाचे हे काम करून घेतले, अशी अनुभूती आली. सद्गुरुदास महाराज यांच्यासह विविध संतांनी मार्गदर्शन केले. भविष्यात डी.लिट.च्या विषयावर पुस्तक लिहिण्याचा मानस आहे.'

सकाळ
नागपूर
शुक्रवार, १४ एप्रिल २०२३

# समाजात सकारात्मक बदल घडविण्यासाठी झटा

## प्रा. टी.जी. सीताराम : विद्यापीठाचा ११० वा दीक्षान्त समारंभ थाटात

▸ सकाळ वृत्तसेवा

नागपूर ता. १३ : जीवनाचा खरा अर्थ केवळ पाच आकडी पगार, आलिशान कार, मोठे घर आणि कुटुंब एवढा मर्यादित नाही. आपल्या जीवनाचे मोल या गोष्टी कमावण्यापेक्षा अधिक आहे. त्यामुळे समाधानी जीवन जगण्यासाठी नातेसंबंध जपा, आपल्या आवडीचा पाठपुरावा करा आणि जगात सकारात्मक बदल घडविण्याचा प्रयत्न करा, असा हितोपदेश अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेचे (एआयसीटीई) अध्यक्ष प्रा. टी. जी. सीताराम यांनी आज विद्यार्थ्यांना दिला.

पान २ वर »




नागपूर : ११० व्या दीक्षान्त समारंभात बोलताना राज्यपाल रमेश बैस व मंचावर उपस्थित कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी व मान्यवर.

### हे आहेत पदकविजेते

- डॉ बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालयाची विद्यार्थिनी नंदिनी समीर सोहनी हिला सर्वाधिक सात सुवर्णपदके आणि दोन पारितोषिके
- डॉ. आंबेडकर इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज अँड रिसर्चचा विकी सुधाकर च्होटे याला सात, डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालयाची अनुप्रिया रविंद्रकुमार प्रसाद हिला पाच, संताजी महाविद्यालयाचा आदर्श कमलदास गिऱ्हेपुंजे याला चार सुवर्णपदके व एक रौप्यपदक
- अरविंदबाबू देशमुख कला व वाणिज्य महाविद्यालय, भारसिंगीचा सोमराज पुंडलिक गिरडकर याला चार सुवर्णपदके व एक पारितोषिक
- डॉ. आंबेडकर विचारधारा विभागाची राजश्री भोजराज ढबाले हिला चार सुवर्णपदके व एक पारितोषिक

### श्रमाला प्रतिष्ठा नाही- राज्यपाल रमेश बैस

■ आपल्या देशात विचित्र परिस्थिती आहे. येथे श्रमाला प्रतिष्ठा नाही. देशातील सुशिक्षित वर्ग छोटी कामे करणाऱ्यांकडे तुच्छतेने बघतो. हे चुकीचे आहे. न्यूझिलंड, ऑस्ट्रेलिया आणि वेस्ट इंडिजसारख्या देशात अनेक माजी क्रिकेटपटू टॅक्सी आणि किराणा दुकान चालवतात. पण भारतात लहानमोठे काम करणाऱ्या व्यक्तिकडे बघण्याचा दृष्टिकोन नकारात्मक आहे. यामुळेच अनेक पदवीधर बेरोजगार राहतात. एकीकडे टपरीधारक, रिक्षाचालक काबाडकष्ट करून चार पैसे कमावून उदरनिर्वाह करतात. तर पदवीधारक नोकरी वाट बघत बेरोजगार राहतात. ही स्थिती पाहून वाईट वाटते, अशी खंत राज्यपाल रमेश बैस यांनी व्यक्त केली. कोणतेही काम प्रामाणिकपणे केले पाहिजे, असे ते म्हणाले.

epaper.lokmat.com 3 लोकमत
नागपूर, शुक्रवार, दि. १४ एप्रिल २०२३

# ८५ व्या वर्षी मिळविली 'लॉ' मध्ये पीएच.डी.

## अशोक करंदीकर म्हणतात, केले की सोपे होते : दीक्षांत समारंभ

लोकमत न्यूज नेटवर्क

**नागपूर** : विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभात एन्ट्रीला टाळ्या आणि शिट्ट्या पडल्या ते म्हणजे अशोक करंदीकर. तरुणांनाही लाजवेल या उत्साहाने पुरस्कार घ्यायला आलेल्या करंदीकरांनी वयाच्या ८५ व्या वर्षी विधी अभ्यासक्रमात पीएचडी पूर्ण केली आणि शिक्षणाला वय नसते, हे पुन्हा एकदा सिद्ध केले.

अशोक करंदीकर यांनी १९६१ साली व्हीआरसीई (आता व्हीएनआयटी) मधून सिव्हिल इंजिनीअरिंग केले. त्यानंतर विविध कंपन्यांसह दिल्लीत एका कंपनीत काम केले. कंपनीचे तांत्रिक सहकारी म्हणून काम करताना सर्वोच्च न्यायालयातील फली नरीमन,



अभिषेक मनू सिंघवी, हरीश साळवे अशा वकिलांच्या भेटी व्हायच्या. तेव्हा आपणही वकील व्हावे असे त्यांना वाटे. २००५ मध्ये नागपूरला आल्यानंतर त्यांनी एका कंपनीत काम सुरू केले.

यानंतर मात्र निर्धार करीत २०१० साली डॉ. आंबेडकर विधी महाविद्यालयात प्रवेश घेतलाच. त्यानंतर सतत यशस्वी होत २०१५ साली एलएलएम पदवीही पूर्ण केली. पुढे डॉ. कोमावार यांच्या मार्गदर्शनात पीएचडीचा प्रबंध त्यांनी सादर केला.

दीक्षांत समारोहात त्यांना डॉ. विठ्ठलराव जिभकाटे पारितोषिकाने सन्मानित करण्यात आले. ते उच्च न्यायालयांत आर्बिट्रेटर म्हणून गरजूंना नि:शुल्क सेवा देतात. जनआक्रोश या संघटनेतही ते कार्य करीत आहेत. हे कसे साध्य केले, असे विचारल्यावर करण्याची जिद्द असली की सर्व सोपे होते, अशी प्रतिक्रिया स्मितहास्य करीत त्यांनी दिली.